!! प्रेसनोट !! दिनांक - ११/०४/२०२४

# गुन्हे शाखेअंतर्गत सायबर पोलीस ठाण्याने Man In the Middle Attack फसवणुकीतील वाचवले ८२.५५ लाख रूपये

दिनांक २३/०२/२०२४ ते दिनांक १६/०३/२०२४ रोजी दरम्यान मुंबईतील एका नामांकित इंटरनॅशनल स्कुलने कॅफेटेरियाचे बांधकामाचे साहीत्य पुरवठा करण्यासाठी UAE मधील Euro phone Acoustics या कंपनीशी करार पक्का केला असता त्या कंपनीने त्यांच्या अधिकृत ई-मेल आय.डी वरून कंपनीचे UAE मधील बॅंक डिटेल्स व्यवहाराकरिता दिले होते. परंतु कोणीतरी अज्ञात इसमाने त्या मेल आय डी सारखा दिसणारा बनावट ईमेल आयडी तयार करून, त्या मेल आय डी वरून इंटरनॅशनल स्कुलला मेल करून नविन USA मधील बॅंक डिटेल्स स्कुलला पाठविले व सदर स्कुलची एकुण रूपये ८७,२६,९९५.६५/- ची आर्थिक फसवणुक केली म्हणून मध्य प्रादेशिक सायबर पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. २०/२०२४ कलम ४१९,४२०,४६५, ४६७,४६८,४७१,३४ भादंविसह कलम ६६ ड माहिती तंत्रज्ञान कायदा २००० अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयात मध्य प्रादेशिक सायबर पोलीस ठाणे येथील अधिकारी व अंमलदार यांनी तात्काळ तांत्रिक व पारंपारिक तपासाची कार्यवाही करून संबधित नोडल बॅंक अधिकाऱ्यांशी तात्काळ संपर्क करून सदर फसवणुकीच्या रक्कमेपैकी एकुण रूपये ८२,५५,९५५/-एवढी रक्कम इंटरनॅशनल स्कुलच्या बॅंक खात्यात परत मिळविण्यात यश मिळविले आहे.

सदरची कार्यवाही मा. श्री. विवेक फणसळकर, पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई शहर, मा. श्री. देवेन भारती, विशेष पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई शहर, मा. श्री. लखमी गौतम, सह पोलीस आयुक्त, गुन्हे, मा. श्री. शशीकुमार मीना, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, मा. श्री. दत्ता नलावडे, पोलीस उप आयुक्त, सायबर गुन्हे, मा. श्री. आबुराव सोनावणे, सहाय्यक पोलीस आयुक्त, सायबर विभाग यांचे मार्गदर्शनाखाली सायबर पोलीस ठाणे, मध्य विभाग, वरळी मुंबईचे प्रभारी पोलीस निरीक्षक मौसमी पाटील, तपासी अधिकारी सपोनि मानसिंग वचकल, पो.ह.क्र. ०३८७६/अभिजीत गोंजारी, पो.ह.क्र. ३३२९९/संतोष गावडे, पोशिक्र. ०८०३०८ शितल सावंत यांनी पार पाडली आहे.

**Man in the Middle Attack प्रकारच्या गुन्हयापासुन वाचण्याकरिता नागरिकांनी खालील काळजी घ्यावी**

- **कंपनीची संगणक साधनसामुग्री ही Advanced Technology ने वेळोवेळी protect व update करावी**
- **ज्या कंपनीशी व्यवहार करण्यात येतो त्या कंपनीची योग्यता व अर्हता नीट तपासुनच करार करावा.**
- **करारामध्ये नमुद ईमेल आयडी व बॅंक डिटेल्स याची दुहेरी खात्री करूनच व्यवहार करण्यात यावा.**
- **कराराव्यतिरिक्त ईमेल आयडी व बॅंक डिटेल्समध्ये अचानक बदल केले गेले तर संबधित कंपनीबरोबर व्यवहारापुर्वी खात्री करा.**
- **बॅंक व्यवहारांदरम्यान ईमेल आयडी, बॅंक खाते क्रमांक, IFSC Code, शाखा इ. नीट तपासा.**
- **कोणतीही फसवणुक झाल्यास त्वरीत सायबर हेल्पलाईन १९३० ला संपर्क साधावा.**